MHPU190013492025

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | ०३.०६.२०२१ |
| नोंदणी दिनांक | ०३.०६.२०२१ |
| निकाल दिनांक | २५.०९.२०२५ |
| कालावधी | वर्ष महिने दिवस |
| | ०४ ०३ २२ |

## न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे यांचे न्यायालय

## (पिठासीन अधिकारी सुनिल श. दहातोंडे यांचे समक्ष)

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १२९८/२०२५ निशाणी क्र.

(जुना संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४३५/२०२१)

### आरोपीचे प्रतिकथन

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडल्याचा दिनांक | – | १५.०७.२०१९ |
| २. गुन्हा दाखल दिनांक | – | १५.०७.२०१९ |
| ३. फिर्यादीचे नाव | – | महाराष्ट्र शासन, तर्फे पोलीस ठाणे यवत, ता. दौंड, पुणे. |
| ४. आरोपीचे नाव | – | १. कानिफ गोपीनाथ केकाण,<br>वय – ५० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>राहणारः पाटस, केकाण वस्ती, ता. दौंड, जि. पुणे.<br>२. भाऊ बाबू कोळपे,<br>वय – ५४ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>राहणारः पाटस, ता. दौंड, जि. पुणे. |

५. गुन्ह्याचा तपशील –

दिनांक १५.०७.२०१९ रोजी दुपारी ०३.४५ वाजण्याच्या सुमारास मौजे पाटस, ता. दौंड, जि. पुणे गावचे हद्दीत बाजरतळाचे खालचे बाजुस ओढ्याचे कडेला काटवनात तुम्ही आरोपी क्र. १ व २ यांनी आरोपी क्र. ३ सोबत सार्वजनिक ठिकाणी 'कल्याण मटका' नावाचा जुगार चालवित असतांना मिळून आले आणि तुमच्या ताब्यातुन रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असे एकुण रुपये २४,५६०/– ऐवज मिळून आला आणि त्याद्वारे तुम्ही **मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ)** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत

येणारा असा अपराध केला आहे.

SUNIL SHARAD DAHATONDE
Digitally signed by SUNIL SHARAD DAHATONDE
Date: 2025.09.25 12:46:53 +0530

स्थळः दौंड (सुनिल श. दहातोंडे)

दिनांकः २५.०९.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी,

लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

## <u>आरोपीचे प्रतिकथन</u>

प्रश्न क्र. १– तुम्ही तक्रारीच्या प्रती स्वीकारल्या का ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र. २– तुम्हाला तुमच्या भाषेत वाचुन व समजुन सांगितलेला गुन्हायाचा तपशील समजला का ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र. ३– तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?

उत्तर – हो, गुन्हा कबुल आहे.

-------------

आरोपी क्र. १ ची सही

-------------

आरोपी क्र. २ ची सही समक्ष

SUNIL SHARAD DAHATONDE
Digitally signed by SUNIL SHARAD DAHATONDE
Date: 2025.09.25 12:46:59 +0530

स्थळः दौंड (सुनिल श. दहातोंडे)

दिनांकः २५.०९.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी,

लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

## <u>आदेश निशाणी १ खाली</u>

आरोपी क्र. १ कानिफ गोपीनाथ केकाण व आरोपी क्र. २ भाऊ बाबू कोळपे आजरोजी दिनांक २५.०९.२०२५ रोजी न्यायालयात हजर झाले. आरोपींनी स्वेच्छेने गुन्हा कबुल करत

असल्याबाबतचा निशाणी क्र.०८ वर पुरसिस दाखल केली आहे. तसेच, जप्त मुद्देमालाशी आरोपींचा काहीही संबंध नसल्याचे नमुद केले आहे. आरोपींच्या विरुद्ध **मुंबई जुगार कायदा कलम १२(अ)** अन्वये प्रकरण दाखल आहे. आरोपी क्र.१ व २ यांनी गुन्हा कबुल केल्यामुळे होणा–या परिणामांची कल्पना त्यांना देण्यात आली आहे. तरीही आरोपी क्र. १ व २ हे गुन्हा कबुल करत आहेत. यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी क्र. १ व २ यांनी स्वेच्छेने गुन्हा कबुल व मान्य केला आहे. शिक्षेविषयी आरोपींचे व आरोपींचे विधिज्ञ यांचे म्हणणे ऐकले. आरोपींनी सांगितले की, ते सराईत गुन्हेगार नसुन त्यांचा हा प्रथम गुन्हा आहे आणि सदर गुन्ह्यासाठी त्यांना पश्चाताप होत आहे, त्यामुळे त्यांना कमीत कमी शिक्षा द्यावी अशी विनंती केली आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद श्रवण केला. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपींनी गुन्हा मान्य केल्यामुळे त्यांना कायद्याप्रमाणे जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी. आरोपींना सदर गुन्ह्याचा पश्चाताप झालेला आहे आणि त्याने स्वतःहुन प्रामाणिकपणे गुन्ह्याची कबुली दिली आहे. या सर्व कारणांचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ कानिफ गोपीनाथ केकाण व आरोपी क्र. २ भाऊ बाबू कोळपे यांचे **फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२** अन्वये **मुंबई जुगार कायदा कलम १२(अ)** प्रमाणे गुन्ह्यासाठी दोषी ठरवुन त्यांना न्यायालय उठे पर्यंत शिक्षा व प्रत्येकी रक्कम रुपये ३००/– (अक्षरी तीनशे फक्त) दंड द्रव्याची शिक्षा सुनावण्यात येत आहे व सदरची दंड द्रव्याची रक्कम न भरल्यास दोन दिवस साधी कैद अशी शिक्षा सुनावण्यात येत आहे.

२. **जप्त मुद्देमाल–**

अ) प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्र. ३ ते ५ विरुध्द खटला प्रलंबित असल्यामुळे मुद्देमालाच्या विल्हेवाटीबाबत कुठलेही आदेश पारित करण्यात येत नाही.

ब) आरोपी भाऊ बाबु कोळपे यांच्याकडुन जप्त करण्यात आलेली रोख रक्कम रुपये ४८६०/– (अक्षरी रुपये चार हजार आठशे साठ फक्त) अपील कालावधी नंतर सरकार जमा करण्यात यावी.

३. आदेशाची प्रत आरोपींना तात्काळ व मोफत देण्यात यावी.

SUNIL SHARAD DAHATONDE
Digitally signed by SUNIL SHARAD DAHATONDE
Date: 2025.09.25 12:47:08 +0530

स्थळः दौंड

दिनांकः २५.०९.२०२५

**(सुनिल श. दहातोंडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

:: **C E R T I F I C A T E** ::

I affirm that the contents of this P. D. F. file of order are word to word, as per its original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | M. C. Atnure |
| Name of Court | : | Sunil S. Dahatonde,<br>J.M.F.C., Railway Court, Daund. |
| Decided on | : | 25.09.2025 |
| Signed on | : | 25.09.2025 |
| Uploaded on | : | 25.09.2025 |